राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांचेमार्फत खारघर, नवी मुंबई येथे प्रशिक्षण केंद्र व त्यास संलग्न रक्त पेढी प्रकल्प उभारण्यास शासन मान्यता देणेबाबत..

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्रमांक : रारसे-२०१३/प्र.क्र.२०१/आ-५,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ३ सप्टेंबर, २०१३.

पहा : १) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे क्र.संआसे/खारघर प्रशिक्षण केंद्र-प्रशासकीय मान्यता/२०१३, दि.३१.०७.२०१३ चे पत्र.

२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे क्र.रारसंप/खारघर प्रशिक्षण केंद्र-प्रशासकीय मान्यता-पुरक माहिती/२०१३, दि.२२.०८.२०१३ चे पत्र.

<u>प्रस्तावना :</u>

सर्वोच्य न्यायालयाचे आदेश दि. ४ जानेवारी, १९९६ नुसार राज्य शासनाने दि. ४ जुलै, २०१३ रोजीच्या आदेशान्वये "राज्य रक्त संक्रमण परिषद" या स्वायत्ता संस्थेची निर्मिती केली आहे. या संस्थेचा मूळ उद्देश राज्यात सुरक्षित रक्ताचा मुबलक पुरवठा वाजवी किमतीत व्हावा असा आहे. या उद्देशानुसार रक्त संक्रमण सेवेत असलेल्या मनुष्यबळाचा तुटवडा लक्षात घेऊन कुशल मनुष्यबळ विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून व अस्तित्वात असलेल्या कर्मचाऱ्यांचे संसाधन विकासाद्वारे बळकटीकरण करण्यासाठी, राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या दि.०२.११.२००७ रोजीच्या १७व्या नियामक मंडळाच्या बैठकीत खारघर, नवी मुंबई येथे प्रशिक्षण केंद्र व त्यास संलग्न रक्तपेढी उभारण्याचा निर्णय घेतला आहे. सदर प्रकल्प उभारण्यास शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

राज्यातील रक्तपेढयांमधील डॉक्टर्स, तंत्रज्ञ, स्टाफ नर्स, रक्तदान शिबीर आयोजक इत्यादीसाठी अत्याधुनिक निवासी प्रशिक्षण मिळण्याच्या दृष्टीकोणातून राज्य रक्त संक्रमण परिषद यांच्यामार्फत खारघर, नवी मुंबई येथे उभारण्यात येणाऱ्या प्रशिक्षण केंद्र व त्यास संलग्न रक्तपेढी प्रकल्पास या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्प उभारणीच्या बांधकामावर होणारा खर्च पुढे दर्शविलेल्या लेखाशिर्षाखाली राज्य रक्त संक्रमण परिषदेस त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून टप्प्याटप्प्याने भागविण्यात यावा.

(कृ.मा.प.)

मागणी क्र. आर-१
२०१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०१-नागरी आरोग्य सेवा विषय चिकित्सा
११०-रुग्णालये व दवाखाने
राज्य योजनांतर्गत योजना
(०६) (२५) रक्त संक्रमण सेवा (२२१०४४७३)
३१- सहायक अनुदाने

सिडकोने सादर केलेल्या देयकास /खर्चास मंजूरी देण्याचे अधिकार राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या नियामक मंडळास अथवा नियामक मंडळाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास प्रदान करण्यात येत आहे.

३. सदर प्रकल्पाच्या उभारणीवर होणारा खर्च भागविण्याकरिता नियोजन विभाग व वित्त विभागाशी केलेल्या अनौपचारिक संदर्भात नियोजन विभागाने खारघर, प्रशिक्षण केंद्र उभारणी प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याच्या अधीन राहून अनुदान उपलब्ध करुन देण्यास सहमती दर्शविली आहे. त्यास वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३४/२०१३/व्यय-१३, दि.०२.०७.२०१३ नुसार सहमती दर्शविली आहे. त्यानुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

31/07/2013

(ज्ञा. ल. सुळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा), मुंबई.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
४) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५) सह संचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई.
६) सहायक संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई.
७) वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
८) नियोजन विभाग (का.१४७२), मंत्रालय, मुंबई.
९) सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती (आरोग्य-५)